# छंद पुष्परचनेचा - ११

नैसर्गिक पुष्परचनेमध्ये 'मिनिएचर पुष्परचना' असा एक प्रकार इकेनोबो स्कूलमध्ये गेल्या काही वर्षात लोकप्रिय होत आहे. झाडाचे बोन्साय करतात त्याचप्रमाणे या रचना अगदी छोट्या असतात. अगदी थोडे मटेरिअल वापरून या रचना करता येतात. अशा प्रकारच्या रचना ८' ✻ ६' या चौकटीमध्ये करतात. या चौकटीमध्ये योग्य दिसेल असे अगदी छोटे पुष्पपात्र निवडावे. एक किंवा दोन पुष्पपात्रे वापरुनही रचना करता येते. ज्या रंगाचे पुष्पपात्र त्याच्याशी रंगसंगती साधणारी पाठीमागची ८'✻६' ची चौकट घ्यावी. या रचना खूप लहान असल्या तरी त्यातही लाईन व मास इफेक्ट दाखवता येतो.

पुढील फोटो पाहाताना वर सांगितलेल्या गोष्टी लक्षात येतील.



फोटो १ - पितळेच्या पुष्पपात्रामध्ये रचना केली आहे. पिंक फ्लॉवर, फर्न, शेवंतीची छोटी कळी याचा वापर केला आहे. ८'✻६' ची क्रिम कलरच्या कागदाचा चौकोन कापून त्यापुढे ही रचना ठेवली आहे.

फोटो १

फोटो २ - फोटो १ मधील पितळेच्या वाजसोबत आणखी छोटा दुसरा पितळी वाज ठेवून रचना केली आहे. छोटा व्हास मोठ्या वाजला पूरक म्हणून वापरला आहे.



फोटो २



फोटो ३ - दोन मातीचे लाल वाज व त्यावरील डिझाईन याला शोभणारी नाजूक पांढरी फुले वापरली आहेत. टायगर लिलीच्या पानांमधून दोन वाजेसचे एकमेकांमधील नाते दाखवले आहे.

फोटो ३



फोटो ४ - लांबट आकाराच्या आडव्या वाजमध्ये रचना केली आहे. वाजच्या उजवीकडे व डावीकडे फुले लावून वेलीच्या काड्यांनी निर्माण केलेल्या रेषांनी रचना जोडली गेली आहे.

फोटो ४

फोटो ५ - चांदीच्या छोट्या तांब्यामध्ये जिरेनियमचे एक पान व पिंक फ्लॉवर लावून अगदी छोटी व साधी रचना केली आहे.



फोटो ५

**सौ. अरुंधती शिरीष देशपांडे**

**इकेनोबो इकेबाना, न्यूयॉर्क चॅप्टर**

asdssd@gmail.com